सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम, २०२६ करिता अग्रीम राज्य हिस्सा पीक विमा हप्त्यापोटी रु. १९०,८०,६८,०९३/- इतका निधी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित विमा कंपन्यांना अदा करण्यासाठी योजनेच्या ESCROW बँक खात्यामध्ये उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०२६/प्र.क्र.२३१/११ अे, ई.ऑ.क्र. १८३३३५८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ०१ ऑक्टोबर, २०२६

वाचा -

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. बैठक-२०२६/प्र.क्र.१२२/११- अे, दि.०३.०७.२०२६

२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. एबख-२०२५/प्र.क्र.७३/२-अे, दि.०६.०६.२०२५

३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०९.०४.२०२६

४) कृषि संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्रपिवियो/सां.८/ESCROW/अग्रीम/र-७१८/२०२६, दि.०१.०९.२०२६

प्रस्तावना :-

राज्यात उत्पादनावर आधारित सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना Cup & Cap Model (८०:११०) नुसार खरीप २०२६, व रब्बी हंगाम २०२६-२७ करिता राबविण्यास संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी ESCROW बँक खाते सुरू करणे तसेच, योजने अंतर्गत विमा अर्ज करण्यापूर्वी मागील खरीप हंगामातील विमा नोंदणी नुसार एकूण देय राज्य विमा हप्त्यापैकी ५० टक्के राज्य हिस्सा अनुदान अग्रीम/प्रथम हप्ता म्हणून ESCROW बँक खात्यामध्ये वर्ग करणे, ही पूर्व अट आहे. तद्नुषंगाने संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी ESCROW बँक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे.

कृषि आयुक्तालयाने त्यांच्या संदर्भ क्र.(४) येथील पत्राव्दारे सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम, २०२६ करीता अग्रीम राज्य हिस्सा अनुदानाचा निधी योजनेच्या ESCROW बँक खात्यामध्ये उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरुन सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम, २०२६ करिता अग्रीम राज्य हिस्सा पीक विमा हप्त्यापोटी रु. १९०,८०,६८,०९३/- इतका निधी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित विमा कंपन्यांना अदा करण्यासाठी योजनेच्या ESCROW बँक खात्यामध्ये उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद पार्श्वभूमीवर सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम, २०२६ करिता अग्रीम राज्य हिस्सा अनुदानापोटी रु.१९०,८०,६८,०९३/- (रुपये एकशे नव्वद कोटी, ऐंशी लाख, अडुसष्ट हजार, त्र्याण्णव मात्र) इतका निधी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित विमा कंपन्यांना अदा करण्यासाठी योजनेच्या ESCROW बँक खात्यामध्ये उपलब्ध करून देण्यास खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

खरीप हंगाम सन २०२६

अ. क्रं.	विमा कंपनीचे नांव	एकुण शेतकरी अर्ज संख्या	विमा संरक्षित क्षेत्र हे. (लाख)	विमा संरक्षित रक्कम रु. (कोटी)	एकुण राज्य हिस्सा विमा हप्ता रक्कम रु.	वितरीत करावयाची अग्रीम राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदान रक्कम रु.
१	भारतीय कृषी विमा कंपनी	४७९३५३	४.०७	२५०७.३६	६१,१३,३३,००६/-	**३०,५६,६६,५०३/-**
२	बजाज जनरल इंन्शुरन्स कंपनी लि.	७७८३१५	५.२५	२८८३.६०	४८,६०,२३,१४१/-	**२४,३०,११,५७१/-**
३	एचडीएफसी एर्गो जनरल इं.कं.लि.	१११४१५०	७.७०	४११८.९१	४५,४९,०५,४७३/-	**२२,७४,५२,७३७/-**
४	इफ्को टोकियो जनरल इं. कं. लि.	२८३६६२६	१७.४८	९८९६.५५	१२१,९३,०१,०९०/-	**६०,९६,५०,५४५/-**
५	एसबीआय जनरल इं. कं. लि.	१५५३८४०	८.२९	४९९४.८२	५५,३५,७०,५३९/-	**२७,६७,८५,२६९/-**
६	युनायटेड इंडिया जनरल इं. कं. लि.	१३५९३९२	९.५४	५८१५.५७	४९,१०,०२,९३६/-	**२४,५५,०१,४६८/-**
	एकुण	**८१२१६७६**	**५२.३३**	**३०२१६.८१**	**३८१,६१,३६,१८५/-**	**१९०,८०,६८,०९३/-**

२. सदरची रक्कम खरीप हंगाम, २०२६ करीता वितरीत करण्यात येत असून, त्याचा विनियोग इतर हंगामाकरीता अनुज्ञेय असणार नाही.

३. प्रस्तुत बाबीवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा :-

मागणी क्र. डी -३
२४०१ - पीक संवर्धन
११०, पीक विमा (००) (०८) प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विमा हप्त्यासाठी अर्थसहाय्य (अनिवार्य) (अनिवार्य)
राज्य हिस्सा (२४०१ A ६६४), ३३- अर्थसहाय्य.

४. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनां व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयानुसारच खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि) यांची राहील.

५. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर, आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौसं क्र.३७६/२०२६/व्यय-१, दि.२३.०९.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६१००११८३०१२५६४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept, 2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F159984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECB8F2F6D6CB0AE6ED5C1E5448349011 9EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.10.01 18:59:26 +05'30'

(प्रतिभा पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११. वित्त विभाग (व्यय-१/ अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई- ३२
१. उप सचिव (११-अे /२-अे), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
२. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, मुंबई क्षेत्रिय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९.

३. विभागीय व्यवस्थापक, बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड, पुणे क्षेत्रिय कार्यालय, ४ था मजला, टॉवर नं.०७, कॉमरझोन आयटी पार्क, सम्राट अशोक पथ, येरवडा जेल रोड, पुणे- ४११ ००६

४. विभागीय व्यवस्थापक, एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लि., सहावा मजला, लीला बिझनेस पार्क, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०००५९

५. विभागीय व्यवस्थापक, इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. नववा मजला, ऑफिस ए, नेक्सस वेस्टेंड, सेक्टर १, बिल्डिंग ए, सर्वे नंबर १६९/१, परिहार चौकाजवळ, डीपी रोड, औंध, पुणे-४११ ००७

६. विभागीय व्यवस्थापक, एसबीआय जनरल इन्शुरन्स कपंनी लिमिटेड, कुमार बिझनेस बी सेंटर, पहिला मजला, १०१/१०२, बंड गार्डन मेट्रो स्टेशनजवळ, बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१

७. विभागीय व्यवस्थापक, युनायटेड इंडिया इंशुरन्स कं.लि., क्षेत्रिय कार्यालय दुसरा मजला, काकडे बीझ, आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

८. निवड नस्ती (कार्यासन ११-अे).